**झरोका**

# नागपूरची विसंगती

## दिलीप चव्हाण

लेखक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे इंग्रजीचे प्राध्यापक आहेत.
ईमेल– dilipchavan@gmail.com

नागपूरमध्ये विदर्भ शिक्षण संघर्ष समितीच्या विदर्भस्तरीय बैठकीसाठी (२७-८-२०१८) गेलो होतो. बैठक ही आमदार निवासातील 'इमारत क्रमांक १' मध्ये आयोजित केली होती. ज्या सभागृहात ही सभा आयोजित करण्यात आली होती त्या सभागृहाचे नावे होते: 'महर्षिपाणिनि सभागृहम'!

**बघा ही पाटी:**




संयुक्त महाराष्ट्रासाठी १०५ हुतात्म्यांनी बलिदान दिले होते. मुंबई, बेळगाव आणि इतर काही प्रांतांसह मराठी भाषेचे राज्य निर्माण करण्यासाठी ही चळवळ होती. महाराष्ट्र निर्माण झाले आणि आता आमदार निवासातील पाट्या संस्कृताळल्या!

बरं, हे संस्कृत तरी नीट आहे का? या पाटीत दोन ढोबळ चुका दिसतातच. संस्कृत लिहिण्याचा एवढा सोस आहे तर ते नीट तरी लिहायला नको का? अर्थात, आता 'त्यांना' तरी संस्कृतशी काय देणंघेणं आहे?

बौद्ध कालखंडाला जेव्हा सुरुवात झाली आणि त्यानंतर जेव्हा संस्कृतला जबरदस्त आव्हान मिळाले तेव्हा पाणिनिने संस्कृतचे व्याकरण रचून वेदांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला. प्राकृतच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे संस्कृतसमोर जे मोठे आव्हान उभे राहिले त्याला प्रतिक्रिया म्हणून संस्कृतचे व्याकरण रचले गेले आणि संस्कृत अधिक बंदिस्त केली गेली, हे गं. ब. ग्रामोपाध्ये यांचे मत स्वीकारायला हरकत नसावी. पाणिनिच्या काळात प्राकृत भाषा अस्तित्वात असताना त्याने या भाषांकडे कोणतेही लक्ष दिले नाही. याउलट, पाणिनिय परंपरेने या भाषांना हिणवण्याचीच भूमिका घेतली.

बंगाली भाषेसंदर्भातील पुढील एक उल्लेख वाचा : "If a person hears the stories of the Puranas or of the Ramayana recited in Bengali, he will be thrown into the hell called

the Rourava."

सदर उल्लेख हा दिनेश चंद्र सेन यांच्या 'अ हिस्ट्री ऑफ बेंगाली लँग्वेज ॲण्ड लिटरेचर' या पुस्तकातील आहे. सेन यांनी पुरेश्या व्यासंगासह असे मांडले की, बांगला भाषेचा विकास बौद्ध आणि इस्लामी राजवटीत झाला. त्यांचे खालील मत बघा:

> This elevation of Bengali to a literary status was brought about by several influences, of which the Mohammadan conquest was undoubtedly one of the foremost. If the Hindu Kings had continued to enjoy independence, Bengali would scarcely have got an opportunity to find its way to the courts of Kings.

जसा इतिहास बंगाली भाषेचा तसाच ओडिया, मराठी, हिंदी वगैरे भाषांचा आहे! 'मराठीप्रेमी' प्राध्यापकांना आणि अभ्यासकांना याकडे बघायला वेळ कुठे आहे? आता साहित्य संमेलनात फडणवीसांचे ५० लाख रुपयांचे लाडू खाल्ल्यानंतर तर ही शक्यता आणखीच कमी होईल.

भारतातील बहुतेक सर्वच प्रादेशिक भाषांचा विकास हा बौद्ध कालखंडात झाला. विशेषत: या भाषांना लिप्या मिळण्याची प्रक्रिया ही बौद्ध कालखंडात सुरू झाली, हे ऱ्हीस डेव्हीस यांचे मत आमदार निवासातील आमदारांना माहिती नसले तरी किमान मराठीच्या प्राध्यापकांना तरी माहिती आहे का? हा प्रश्न यासाठी उपस्थित होतो की, मराठीचे अनेक प्राध्यापक संस्कृताळलेले मराठी




बोलण्यासाठी जीवाचा आकांत करतात. त्यांना ती तशी बोलता येतेच असे नाही. पण एका बाजूला प्रमाण भाषेचा कमालीचा आग्रह धरायचा व संस्कृताळलेली मराठी बोलण्याची धडपड करायची आणि दुसऱ्या बाजूला ज्या प्रमाण भाषेचा एवढा सोस तीदेखील नीट बोलायची नाही. एक काहीतरी करा गड्यांनो!

पूर्वीच्या पुणे विद्यापीठातील (आजच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) एका मराठीच्या प्राध्यापकाने रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयात 'तुम्ही 'पानी' असे उच्चारता! 'पाणी' असें उच्चारायला तुमची जीभ वळत नाही का? असे उद्गार उद्दामपणे काढले होते. आपण (प्राध्यापक) शालेय स्तरावर मराठीच्या विविध बोलींविषयी सहिष्णू धोरण असावे अशी अपेक्षा करतो. परंतु महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय स्तरावर आपण आपल्या विद्यार्थ्यांना अशी सहिष्णुतेची वागणूक देतो का? जर देत नसू तर ती 'भाषिक हिंसा' ठरते. अन्तोनिओ ग्राम्शी याने त्यांच्या बहिणीला तुरुंगातून लिहिलेल्या पत्रात बहिणीच्या मुलांना स्थानिक इटालीयन भाषा (तिच्या स्थानिक लकबीसह) बोलू देण्याविषयी लिहिले होते. ग्राम्शीला टाळून भाषेचे प्रश्न सुटणार नाहीत.

पुन्हा नागपूरकडे येऊ. नागपूरमधील याच आमदार निवासातील सोबतची पाटी बघा.

महाराष्ट्रातील महिला आमदारांची ही नावे आहेत. यात किती चुका आहेत, बरं? डॉ. नीलम गोऱ्हे की निलम गोऱ्हे की नीलम गोरे की निलम गोरे? ह्या शिवसेनेच्या आमदार आहेत. एका बाजूला

संस्कृतचा सोस; दुसऱ्या बाजूला थेट विधिमंडळाशी जोडलेल्या एका इमारतीत मराठीची ही दशा!

याच आमदार निवासातून आम्ही बाहेर पडलो तर लगेच अगदी समोर एक सायकल रिक्षा चालवणारी एक व्यक्ती रिक्षा घेऊन येऊन थांबली.



केवढी ही विसंगती! एका बाजूला नागपूरात मेट्रोची धांदल सुरू आहे; तर दुसऱ्या बाजूला माणसाने माणसाला ओढून वाहून नेण्याची ही सक्ती! माझे बालपण विदर्भातील आहे. सायकल रिक्षा ओढणारे लोक छातीचा पिंजरा होऊन मरताना मी पाहिलेले आहेत. '५६' इंचाच्या छातीवाल्यांना हे लोक दिसत नाहीत; अन् आपल्या डोळ्यासमोरून हे लोक हटत नाहीत. टकराव अटळ आहे.

पश्चिम बंगालमधील कम्युनिस्ट सरकारने २००५-०६ मध्ये अशा अमानवी प्रथेवर बंदी आणण्याचे धैर्य दाखविले होते. महाराष्ट्रातील सरकार मेट्रोच्या धुमश्चक्रीत हे करणार आहे काय?

तसेही, नागपूर हे अनेक विसंगतींनी व्यापलेले आहे. संपूर्ण भारतच कमालीच्या विसंगतींनी युक्त आहे. भारत हा एकाच वेळी अनेक युगांमध्ये जगत असतो, असे म्हणूनच म्हटले जाते. या कमालीच्या विसंगतींपासून लवकरच भारताची सुटका होवो, हीच सदिच्छा!

●

## अरविंद देशपांडे : एक आदर्श शिक्षक (पृष्ठ.क्र. ६० वरून)

अडचणी असत. इंग्रजीबाबत न्यूनगंड असे. नोकरीची चिंता असे. अशा विद्यार्थ्यांना ते धीर देत; प्रोत्साहन देत व मार्गदर्शन करत. सर्वच विद्यार्थ्यांशी व सहकाऱ्यांशी सर अतिशय जिव्हाळ्याने वागत. नेहमी प्रसन्न मुद्रा असलेले सर विद्यार्थ्यांमध्ये अतिशय लोकप्रिय होते. ते सतत कार्यमग्न असत. आम्हाला ते नेहमी सांगत, 'कामात बदल हाच विरंगुळा!' आम्हा विद्यार्थ्यांना एकदा गप्पांच्या ओघात ते म्हणाले, 'एखाद्या संध्याकाळी आपल्या कुटुंबियांसमवेत बसलेले असताना तुम्ही माझी आठवण काढली, तरी मला ती पुरेशी आहे.' गेल्या ४ जुलैला सर जाऊन सोळा वर्षे झाली. मात्र त्यांच्या आठवणी आजही मनात ताज्या आहेत. किती प्रसंग, किती क्षण नेहमी आठवत राहतात. आम्ही मित्रमंडळी भेटल्यावर सरांचा विषय निघतोच. 'सर त्यावेळी असे म्हटले होते... ते कसे बोलायचे आणि ते असे सांगायचे' असे बोलताना आमच्यापैकी कितीतरी जण आजही हळवे होतात.

अकादमिक विश्वात एकमेकांविषयी असूया बाळगणारे, क्षुद्र राजकारण करणारे अवलिये अनेक दिसतात. देशपांडे सरांच्या मनात मात्र कोणाविषयी कधीही द्वेष-असूयेला थारा नव्हता. इतिहासतज्ज्ञ म्हणून तर ते थोर होतेच. मात्र माणूस म्हणूनही ते खूप मोठे होते. सर्वसाधारणपणे विद्वान लोक विक्षिप्त, तुसडे वा माणूसघाणे असतात आणि माणसांमध्ये मिसळणारे प्राध्यापक विद्वान असतातच असे नाही. सर मात्र खरोखर एक दुर्मिळ रसायन होते. ते विद्वान होते, रसिक होते आणि अतिशय प्रेमळही होते. सरांच्या विस्तारित कुटुंबातील काहीजण सर्वार्थाने त्यांचा हा वारसा जपण्याचा प्रयत्न करत आहेत.

●